# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

**जळगाव दि.७ (प्रतिनिधी) :-** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा आंतरमहाविद्यालयीन युवारंग युवक महोत्सवाची तयारी पुर्ण झाली असून पाचही रंगमंच सज्ज झाले आहेत, उद्या दि. ०८ ऑक्टोबर पासून संघाचे आगमन होणार असून त्यांची नोंदणी केली जाणार आहे तसेच सायंकाळी ६ वाजता संगीत आनंदमठ या महानाट्याचा प्रयोग सादर केला जाणार आहे.

यंदाचा युवक महोत्सव जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट (स्वायत्त) येथील प्रांगणात होत असून रंगमंच सज्ज झाले आहेत. युवारंगाची २५ वर्षाच्या गौरवशाली परंपरा कायम ठेवत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने हा युवक महोत्सव घेण्यात येत आहे. या युवक महोत्सवात "वंदे मातरम १५०" संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला दिशा देणाऱ्या क्रांतीची ज्वाला पेटविणाऱ्या आणि राष्ट्रभक्तीच्या चेतनेला आकार देणाऱ्या बक्कीमचंद्र चटर्जी यांच्या वंदे मातरम या राष्ट्रगीताला आणि आनंद मठ या कादंबरीला १५० वर्षे पूर्ण होत आहे. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधत यंदाचा युवक महोत्सव कलात्मक, संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा भव्य महासंगम होणार आहे.

या युवक महोत्सवाच्या तयारीचा कुलगुरू प्रा. व्ही एल. माहेश्वरी यांनी आढावा घेतला आहे. या युवक महोत्सवाकरिता पाचही रंगमंच सज्ज झाले असून तयारी पूर्ण झाली असल्याचे संचालिका प्रा. प्रीती अग्रवाल व प्रा. संजय शेखावत तसेच विद्यार्थी विकास विभागाचे प्रा. जयेंद्र लेकुरवाळे यांनी सांगितले.

या महोत्सवा करिता विविध पंचवीस समिती तयार केली असून मुलींच्या निवासाची व मुलांच्या निवासासाठी स्वतंत्र व्यवस्था वेगवेगळया इमारतींमध्ये करण्यात आली आहे. या युवक महोत्सवात सहभागी संघांसाठी भोजन व्यवस्था देखील महाविद्यालयाच्या आवारातच करण्यात आली आहे एकूण ११४ महाविद्यालयांनी या युवक महोत्सवात सहभागी होत असून महाविद्यालयांच्या व्यवस्थापकांसह एकूण १८०० विद्यार्थी या युवक महोत्सवात आपल्या विविध कला सादर करून युवारंगात रंगून जाणार आहेत.

या महोत्सवासाठी सज्ज करण्यात आलेले रंगमंच क्र. १ बकिमचंद्र चटोपाध्याय सभागृह, रंगमंच क्रमांक २ स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, रंगमंच क्रमांक ३ कवी प्रदीप सभागृह, रंगमंच क्रमांक ४ कवी प्रेम धवन सभागृह आणि रंगमंच क्रमांक ५ राष्ट्र संत तुकडोजी महाराज सभागृह असे आहेत.

संगीत आनंदमठ महानाट्याचा प्रयोग
दि ८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता ऋषी बंकीमचंद्र चटपोध्याय यांच्या आनंदमठ या अजरामर कादंबरीवर आधारित कोलाज क्रिएशन पुणे निर्मित मातृभूमीच्या उत्कट प्रेमाची अनुभूती देणारे अलौकीक संगीत आनंदमठ हे नाटक सादर केले जाणार आहे.

**उदघाटन समारंभ**
दिनांक ९ ऑक्टोंबर रोजी सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी राज्याचे जलसंपदा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री गिरीश महाजन यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोक जैन हे उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी हे असून रायसोनी एज्युकेशनचे चेअरमन सुनील रायसोनी व प्र. कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे यांच्यासह विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य स्वागत अध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, युवारंग चे कार्याध्यक्ष नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या समवेत विविध विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य व रायसोनी एज्युकेशन चे पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

मा.संपादक

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

बातमी क्रमांक १

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फ गांधी सप्ताह २०२५ चे आयोजन करण्यात आलेले आहे. आज दि. ७ ऑक्टोंबर रोजी गांधी सप्ताहच्या समारोपाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात 'महात्मा गांधीच्या विचारांच्या प्रभावाचा प्रवाह' या विषयावर डॉ. जयदेव डोळे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे  होते. तर विचार मंचावर विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे, महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. अतुल बारेकर हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. जयदेव डोळे म्हणाले की, विश्वामध्ये सर्वत्र युद्ध सुरु आहेत. या युद्धांमुळे उपासमारीसारखी परिस्थिती निर्माण होऊन हजारो लोक मृत्युमुखी पडताहेत. या अविचारी वृत्तीवर मात करण्यासाठी जगाला महात्मा गांधीनी दिलेल्या अहिंसेचा विचार जोपासावा लागणार आहे. आजही महात्मा गांधींच्या विचाराच्या प्रभावाचा प्रवाह हा पर्यावरण, शिक्षण व राजकारण यांमध्ये प्रेरित आहे.भारताच्या राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मू यांची साधी राहणी हा सुद्धा गांधीच्या विचारांचा प्रभाव असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

प्र-कुलगुरू प्रा. इंगळे अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, महात्मा गांधींच्या विचाराची संपूर्ण समाजाला आवशक्यता आहे. सोभावतलच्या अहिंसेला पाहून महात्मा गांधींच्या विचारांची आठवण येते. महात्मा गांधींचा साधी राहणी व उच्च विचार सारणी हे तत्त्व आजच्या समाजाला प्रेरक ठरणारे आहेत गांधीजींनी सांगितलेल्या शांती अहिंसा व करूणा या विचारांचा अवलंब करून आजची युवा पिढी आत्मनिर्भर होऊ शकते असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर दीपक खरात तर प्रास्ताविक प्रा. म सु पगारे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉक्टर अतुल बारेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

बातमी क्रमांक २

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फ गांधी सप्ताह २०२५ चे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानिमित्ताने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आज दि. ७ ऑक्टोंबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात पार पडला.

यामध्ये दि. ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थ्यांकरिता भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या भित्तीपत्रक स्पर्धेत प्रथम क्रमांक फरीदा गुलशेर तडवी, द्वितीय क्रमांक विद्या विशाल सोनावणे व तृतीय क्रमांक लहू शिवाजी मोरे या विद्यार्थ्यांनी पटकाविला. तर दि. ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी वक्तृत स्पर्धेत प्रथम क्रमांक विवेक पितांबर पाटील, द्वितीय क्रमांक अमोल दिलीप पाटील व तृतीय क्रमांक वेभव सुरेश भोंबे या विद्यार्थ्यांनी पटकाविला. तसेच दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थासाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक देवयानी एस. जयकर, द्वितीय क्रमांक धनश्री एस, बडगुजर व तृतीय क्रमांक काव्या आनंद गायकवाड ह्या विद्यार्थिनीला मिळाले. सदर स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम प्रथम १०००/- रु.. द्वितोय ७००/- रु., तृतीय ५००/- रु. अशा स्वरूपाचे बक्षिसे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आलीत.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे हे होते. तर मंचावर मा. डॉ. जयदेव डोळे, छ. संभाजीनगर, विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. म. सु. पगारे, महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. अतुल बारेकर हे उपस्थित होते.

बातमी क्रमांक ३

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे गांधी सप्ताह निमित्त पी. एम. श्री केंद्रीय विद्यालय, जळगाव येथे चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत सहभागी एकूण ३५ स्पर्धकांनी स्वच्छ भारत और गांधीजी, गांधीजी की ऐनक से भारत, मोहनदास से महात्मा तक, अंग्रेज बनाम गांधीजी या विषयावर चित्र काढून महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. या वेळी महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. अतुल बारेकर, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य मोना कुमार आदि उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रथम पारितोषीक कु. देवयानी जयकर यांना,द्वितीय पारितोषीक कु. बडगुजर यांना नर तृतीय पारितोषीक कु. काव्या गायकवाड यांना मिळाले.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्रीमती नीनिका शर्मा आणि समन्वयक म्हणून प्रा. मोईन शेख यांनी काम पहिले. स्पर्धा आयोजित करण्याकरिता विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे यांचे मार्गदर्शन लाभले.

बातमी क्रमांक ४

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बौद्धिक संपदा हक्क' प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या बॅचची सुरुवात करण्यात आली आहे. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या उपस्थितीत अभ्यासक्रमाच्या माहितीपत्रकाचे औपचारिक अनावरण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभागाचे समन्वयक प्रा. विकास गिते यांनी सदर अभ्यासक्रमाची माहिती दिली. तसेच विभागामार्फत या वर्षापासून पासून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती आणि इंटर्नशिप बद्दल उपस्थितांना अवगत केले.यावेळी विद्यापीठात सुरु झालेल्या या रोजगारक्षम अभ्यासक्रमासाठी विज्ञान विषयातून बारावी उत्तीर्ण व्यक्ती नोदणी करू शकणार असल्याने जास्तीत जास्त संख्येने इच्छुकांनी लाभ घेण्याचे आवाहन विभागाचे समन्वयक प्रा. विकास गीते यांनी केले आहे.

अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. एस. टी. इंगळे यांनी बौद्धिक संपदा हक्क नोंदणी वाढवण्यासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांची माहिति दिली. या अभ्यासक्रमामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील विदयार्थ्यांना पेटंट एजन्ट किंवा पेटंट तपासनीस सारख्या पदांसाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी फायदा होणार आहे. तसेच अधिकाधिक प्रमाणात दर्जेदार पेटंट नोदणी होण्यासदेखील मदत होणार असल्याचे सागितले. आजच्या युगात बौद्धिक संपदा हक्कांचे महत्व विशद करताना प्रा. इंगळे यांनी समाजोपयोगी उपयुक्त संशोधन वाढवण्यावर भर देण्याची आवश्यकता असल्याचे याप्रसंगी अधोरेखित केले आणि विद्यापीठाच्या बौद्धिक संपदा हक्क विभागाच्या कामाचे कौतुक केले.

सदर कार्यक्रमास बौद्धिक संपदा हक्क विभागातील पीठासीन प्राध्यापक डॉ. डी. जी. हुंडीवाले, रसायनशारत्र विभागाचे संचालक प्रा. दीपक दलाल आणि संशोधक विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सारंग बारी तर आभारप्रदर्शन श्री. मयूर पाटील यांनी केले.

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ७ ऑक्टोबर, २०२५

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी

करीता